# मेहतर समाजाच्या कल्याणासाठी विविध योजना व सद्य:स्थिती

**विजय दे.रजाणे**
मानवलोक समाजकार्य महाविद्यालय व संशोधन केंद्र,
अंबाजोगाई, जि. बीड

**गोषवारा :**

मेहतर समाजाच्या कल्याणासाठी वेगवेगळ्या कालखंडात केंद्र व राज्य सरकारने विविध काळात कल्याणकारी योजनांची निर्मिती केलेली दिसून येते. या योजनेचा मुख्य उद्देश मेहतर समाजाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीत सुधारणा घडवून आणणे व त्यांचे जीवनमान उंचावणे या उद्देशाने विविध योजनांची निर्मिती झाली असून या योजनांमधून मेहतर समाजाच्या जीवनमानात बदल झालेला आहे का? तसेच विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेताना मेहतर समाजाला अडचणी उद्‌भवतात का? हे अभ्यासले जाणार असून या कल्याणकारी योजनातून सामाजिक न्यायाची संकल्पना वास्तविकतेतून रुजलेली असे दिसून येते का? याचे अध्ययन करणे महत्त्वाचे आहे.

**मुख्य स्त्रोत :** मेहतर समाज, कल्याणकारी योजना, सामाजिक न्याय, योजनांचे महत्त्व

**प्रस्तावना :**

भारत हे कल्याणकारी राज्य आहे असे आपण म्हणतो. कल्याणकारी राज्याची संकल्पना राबवित असताना समाजाच्या सर्व घटकांना उचित व सामाजिक वितरणात्मक न्याय मिळालेला आहे का? हे अध्यासण्यासाठी समाजातील हजारो वर्षापासून उपेक्षित व वंचित समजला जाणारा समाज म्हणजे मेहतर समाज. सद्य:स्थितीतही मेहतर समाज उदरनिर्वाहासाठी पारंपरिक मैला सफाई व्यवसायाचे काम करताना दिसून येतो. त्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीत सुधारणा झालेली दिसून येत नाही. भारतीय राज्यघटनेमध्ये कलम १४ अन्वये समानतेच्या तत्वाचा पुरस्कार केलेला आहे. तसेच १७ अन्वये अस्पृश्यता निर्मूलन याचाही पुरस्कार केल्याचे दिसून येते. आधुनिक तंत्रज्ञानात विविध बदल झालेले असले तरी मेहतर समाजाच्या आर्थिक,

सामाजिक व कौटुंबिक स्थितीत मोठ्या प्रमाणात बदल झालेले दिसून येत नाही. यामागे मेहतर समाजातील असलेले अज्ञान, उच्च शिक्षणाचा अभाव पारंपरिक व्यवसाय असलेला कल विविध रुढी परंपरा याचा असलेला पगडा म्हणून विकासाच्या मुख्य प्रवाहात मेहतर समाज आलेला दिसून येत नाही. अशा समाजातील उपेक्षित वंचित घटकाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी भारतीय राज्य घटनेमध्ये मेहतर समाजाचा समावेश अनुसूचीत जाती मध्ये झालेला आहे. त्याच्या जीवनामानात सुधारणा घडून येण्यासाठी व पारंपरिक व्यवसायातून त्यांना मुक्त करून त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने विविध कल्याणकारी योजनांची निर्मिती केल्याचे दिसून येते. या कल्याणकारी योजनांचा लाभ व योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे घडून आल्यास त्याचा फायदा मेहतर समाजाला होण्यास मदत होऊ शकते. सदर संशोधनात संशोधकाने मेहतर समाजासाठी असलेल्या विविध कल्याणकारी योजनांचा अभ्यास केलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१) मेहतर समाजाच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आढावा घेणे.

२) मेहतर समाजाच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचे महत्त्व समजावून घेणे.

**गृहीतकृत्ये :**

१) मेहतर समाजाच्या कल्याणासाठी असलेल्या विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी केल्यास त्यांच्या सामाजिक जीवनात बदल होऊ शकतो.

२) मेहर समाजाला विविध कल्याणकारी शासकीय योजनाचा लाभ घेताना अडचणी येऊ शकतात.

**संशोधन आराखडा :**

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने वर्णनात्मक संशोधन आराखड्याद्वारे मांडणी करण्यात केलेली आहे. यामध्ये मेहतर समाजाच्या कल्याणासाठी विविध योजना व सद्य:स्थितीचा अभ्यास वर्णनात्मक पद्धतीने सविस्तरपणे वर्णन केले आहे.

**तथ्य संकलन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन अध्ययनासाठी संशोधकाने द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा वापर केलेला असून यामध्ये विविध संदर्भीय पुस्तके, प्रत्यक्ष निरीक्षणे, वेब साईड, मासिक यांचा वापर करून तथ्यांचे संकलन करून अभ्यास विषयाची मांडणी केली आहे.

**मेहतर समाजासाठी असलेल्या कल्याणकारी योजना :**

मेहतर समाजाच्या कल्याणासाठी वेगवेगळ्या कालखंडात केंद्र व राज्य सरकारने विविध शासकीय कल्याणकारी योजनांची निर्मिती केल्याचे दिसून येते मेहतर समाजास मुख्य प्रवाहात आणून त्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. विविध योजनांच्या माध्यमातून विकासाची गंगा या समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्व योजनांची माहिती लाभधारकांना व्हावी आणि त्यांना या योजनांचा लाभ होऊन आपले जीवन समृद्ध करावे या उद्देशाने योजनांची निर्मिती केलेली असते. सरकारी संस्था आणि स्वयंसेवी संस्थामार्फत खालीलप्रमाणे योजना राबविण्यात येत असते.

**मेहतर समाजासाठी विविध कल्याणकारी योजनांचे महत्त्व :**

भारत देशामध्ये समाजामध्ये असलेल्या उपेक्षित, वंचित, दुर्लक्षित, समाजाच्या मुख्य प्रवाहाच्या बाहेर असलेल्या घटकासाठी विशेषत: अनुसूचित जाती व जमातीसाठी स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून सद्य:स्थितीत विविध कल्याणकारी योजनाची अंमलबजावणी पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून करण्यात आलेली दिसते. योजना या समाजात बदल घडवून आणण्यासाठी समाजातील उपेक्षित घटकाचा विकास व्हावा आणि निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत मदत व्हावी. ज्या घटकासाठी योजना तयार करण्यात आलेली आहे, त्यांचा प्रत्यक्ष लाभ त्या समूहाला व्हावा म्हणून सामाजिक न्याय व कल्याणकारी हेतू साध्य करण्यासाठी भारतीय राज्यघटनेतील मूलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्त्वे याला अनुसरुन योजना तयार करण्यात आलेली आहे.

मेहतर समाजाचा समावेश एस.सी. मध्ये अनुसूचित जाती प्रवर्गात होतो. या समाजाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक जीवनमानात सुधारणा घडून येण्यासाठी विविध योजनांची निर्मिती

करण्यात आलेली आहे. योजनामुळे विशिष्ट उद्देश पूर्ण केले जातात. सामाजिक न्यायाची संकल्पना रुजविली जाते. मेहतर समाज जातीव्यवस्थेतील सर्वात खालचा स्तर असल्याने त्याच्या जीवनामानात बदल होण्यासाठी मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध कल्याणकारी योजनांची निर्मिती केलेली आहे. यामध्ये केंद्रशासन पुरस्कृत असलेल्या योजना व प्रत्येक राज्य सरकारच्या योजना निर्माण करण्यात आलेल्या आहेत. या योजनाचा लाभ मेहतर समाजाच्या घटकांनी घेतल्यास त्यांना वेगवेगळा प्रकारचा फायदा होऊ शकतो.

**१) अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती- २००३-०९-**

१) या योजनेअंतर्गत हाताने सफाई करणाऱ्या कर्मचाऱ्याच्या मुलांना अनुदान दिले जाते.

२) उद्देश - अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी व त्यांना समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी योजना लागू केलेली आहे.

३) सफाई कामगाराच्या मुलांचा शिक्षणाचा स्तर वाढविते.

**२) सफाई कामगारांच्या पुनर्वसनासाठी स्वयंरोजगार योजना - २००७**

- हाताने सफाई कामगाराच्या पुनर्वसनासाठी स्वयंरोजगार योजना सुरु केलेली आहे.

- या योजने अंतर्गत प्रशिक्षण आणि भत्ता दिला जातो.

**३) सफाई कामगाराच्या मुक्ती आणि पुनर्वसनाची राष्ट्रीय योजना** (NSLRS) **१९९२**

- या योजने अंतर्गत सफाई कामगारावर अवलंबित असलेल्यांना प्रशिक्षण, भत्ता आणि लाभार्थ्यांना व्यवसायासाठी अनुदान देण्यात येते.

**४) मिशन गरिमा :**

- या योजने अंतर्गत स्वच्छता कर्मचाऱ्याना आरोग्यासाठी चांगल्या सुविधा पुरवणे. शिक्षण आणि कौशल्य निर्मितीच्या माध्यमातून मुलांना उपजीविकेच्या चांगलया संधी उपलब्ध करून देणे.

**५) माळीण ब्यासा आवास योजना २००१**

- भारत सरकारने २००१ मध्ये ही योजना सुरु केली आहे.

- निवारा प्रदान करणे, झोपडपट्टी मुक्त करणे या योजनेचा उद्देश आहे. या योजने अंतर्गत दारिद्र्य रेषेखालील लोकांचा निवारा सुधारते किंवा निवारा प्रदान करते.

**सारांश :**

भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाली असली तरी समाजातील अनेक घटक मुख्य प्रवाहापासून बाहेर आहेत. यामध्ये मेहतर समाज उपेक्षित असलेला दिसतो. या समाजातून शिक्षणाचे प्रमाण अत्यंत कमी आहे. विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करूनही मेहतर समाजाच्या आर्थिक व सामाजिक, शैक्षणिक स्थितीत सुधारणा झाल्याचे दिसून येत नाही. कल्याणकारी योजनांचा मुख्य हेतू समाजात सामाजिक न्याय प्रस्थापित करणे हा असून मेहतर समाजात असलेल्या जातीयत्तेच्या घटकांमुळे हा समाज आजही हलाकीचे जीवन जगताना दिसून येतो. मेहतर समाजाच्या राहणीमानात बदल होण्यासाठी व त्यांना दर्जा व प्रतिष्ठा मिळून देण्यासाठी कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी शासनाने तळागाळात जाऊन करणे व मेहतर समाजाला मुख्य प्रवाहात आणणे हे मोठे आव्हान केंद्र सरकार व राज्य सरकार आणि समाज यांच्यावर आहे. यासाठी शासनाने / प्रशासनाने प्रभावी कार्य करणे अत्यंत गरजेचे आहे.

**निष्कर्ष :**

१) विविध कल्याणकारी योजना असूनही मेहतर समाजाच्या कौटुंबिक, आर्थिक स्थितीत सुधारणा झालेली दिसून येत नाही.

२) कल्याणकारी योजनांचा लाभ घेताना मेहतर समाजाच्या व्यक्तींना वेगवेगळ्या अडचणी निर्माण होतात.

३) प्रशासकीय पातळीवर मेहतर समाजासाठी असलेल्या योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही.

४) मेहतर समाजातील व्यक्ती शासनाच्या कल्याणकारी योजनांपासून अज्ञानी असल्याचे दिसून येतात.

५) कल्याणकारी योजनांची मेहतर समाजामध्ये जनजागृती करण्याची गरज मोठ्या प्रमाणात आहे.

**शिफारशी :**

१) मेहतर समाजातील व्यक्तीला शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी असलेल्या शासकीय अर्टी, शर्ती यामध्ये बदल करण्यात यावा.

२) शैक्षणिक गुणवत्ता सुधारणा करण्यासाठी स्थानिक पातळीवर तसेच स्थानिक प्रतिनिधीच्या माध्यमातून प्रयत्न करण्यासाठी पुढाकार घ्यावा.

३) योजनांचा प्रचार करण्यासाठी मेहतर समाजातील सुशिक्षित किंवा तरुणांची नियुक्ती करून त्यांच्यामार्फत प्रचार, प्रसार करण्यात यावा.

**संदर्भ ग्रंथ :**

१) बॉम्बे गॅजेटियर - आठवां खंड, बीसवा खंड, १९८४

२) बी. एच. मेहता - सोशल अ‍ॅण्ड इकोनॉमिक्स कंडिशन्स ऑफ मेघवाल, अनटचेबल्स ऑफ बॉम्बे सिटी, शोध प्रबंध

३) १९१० जनगणना कमिशन का रिपोर्ट - कमिशनर का वक्तव्य भाग -१

४) बी. एन. बर्वे - चेअरमन रिपोर्ट ऑफ द स्कैव्हजर इन्कव्हरी कमिटी, बॉम्बे १९५८-५४

५) शिंदे विठ्ठल रामजी, भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न, मुंबई, १९७६